**!! श्री !!**

**सौदापावती**

सौदापावती रक्कम रू. १०,६५,०००/- अक्षरी रू. दहा लाख पासष्ठ हजार मात्रची कसबे अमळनेर, ता. अमळनेर, येथील बांधीव घर व बखळ प्लॉट मिळकतीची तारीख १०/११/२०२१ रोज बुधवारचे दिवशी, लिहून घेणार व लिहून देणार पुढील प्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| १) | सौ. उषाबाई तुकाराम महाजन,<br>वय - ४० वर्षे, धंदा - गृहिणी, | लिहुन घेणार |
| २) | श्री. चेतन तुकाराम महाजन,<br>वय - २२ वर्षे, धंदा - व्यापार,<br>दोघे रा. गुरव कॉलनी, पारोळा रोड,<br>अमळनेर, ता. अमळनेर, जि. जळगांव. | |

१) गिरीराज डेव्हलपर्स, अमळनेर तर्फे
अ) श्री. प्रसन्न सोभागमल पारख, वय - ४८ वर्षे,
ब) श्री. मिहीर हेमंत पवार, वय - २४ वर्षे,
दोघांचा धंदा - शेती व व्यापार,
दोघे रा. अमळनेर, ता. अमळनेर, जि. जळगांव. } लिहुन देणार

आम्ही कारणे सौदापावती लिहुन देतो की, कसबे अमळनेर, तालुका अमळनेर येथील शेतगट नं. ४६६ हि मिळकत आमचे स्वकष्टार्जीत मालकीची व ताबे उपभोगातील व वहिवाटीतील असल्याने तिची आमचे मर्जीनुरूप विल्हेवाट लावण्याचा आम्हाला पुर्ण अधिकार आहे. सदर मिळकतीमध्ये आम्ही ७१ रो-हाऊस बांधलेले असून त्यापैकी प्लॉट नं. ३१ हि बांधीव घर व बखळ जागा मिळकत मी तुम्हास आजरोजी रक्कम रू. १०,६५,०००/- अक्षरी रू. दहा लाख पासष्ठ हजार मात्रला पुर्ण व कायम खरेदी देण्याचा सौदा निश्चित केला.

**त्या बांधीव घर व बखळ मिळकतीचे वर्णन व ठिकाण -**

तु. जि. जळगाव पो.तु. ता. अमळनेर पैकी कसबे अमळनेर येथील आर.सी.सी. मध्ये बांधीव घर व बखळ मिळकत.

१) कसबे अमळनेर, ता. अमळनेर येथील शेतगट नं. ४६६ "गणपती नगर" मधील प्लॉट नं. ३१ यांसी एकूण क्षेत्रफळ ६४.६ चौ.मी. यामध्ये आर.सी.सी, मध्ये बांधीव रो-हाऊस मिळकत क्षेत्र ४८.५८ चौ.मी. असून उर्वरीत १६.२ चौ.मी. बखळ जागा आहे.

सदर मिळकतीमध्ये एक किचन, एक रूम, एक हॉल व संडास बाथरूम असे बांधकाम केलेले आहे.

**यांसी मोजणी**

**पुर्व बाजू** - ३.८० मी., **पश्चिम बाजू** - ३.८० मी.,
**उत्तर बाजू** - १७.०० मी., **दक्षिण बाजू** - १७.०० मी.

**यासी चतु:सिमा**

**पुर्वेस** - ६.० मी. रस्ता व वापर, **पश्चिमेस** - प्लॉट नं. २२, २३,
**उत्तरेस** - प्लॉट नं. ३२, **दक्षिणेस** - प्लॉट नं. ३०.

येणेप्रमाणे चतु:सिमेतील बांधीव घर व बखळ मिळकत दगड माती व तदंग भुत वस्तु सुद्धा, सदर मिळकतीचा वापर पुर्वेस आहे. ज्या काही सुविधा असतील त्या सर्व सुविधांसह. तसेच सदर मिळकतीच्या गच्चीवरील मालकी हक्कासह.

येणेप्रमाणे वर वर्णन केलेली मिळकत आम्ही तुम्हास आज रोजी रक्कम रुपये रु. १०,६५,०००/- अक्षरी रू. दहा लाख पासष्ठ हजार मात्रला पुर्ण व कायम खरेदी देण्याचा सौदा निश्चित केला.

**सदर सौदापावतीचा भरणा**

२,१४,०००=०० रक्कम रु. दोन लाख चौदा हजार मात्र आम्ही तुमचेपासून दि. ३०/०८/२०२१ रोजी बयाणापोटी खालील साक्षीदारांचे समक्ष रोख घेतलेत. ती रक्कम आम्हास कबुल व मान्य. ते यात मजरा.

| | |
|---|---|
| ८,५१,०००=०० | रक्कम रू. आठ लाख एक्कावन्न हजार मात्र तुम्ही आम्हांस सदर मिळकतीचे खरेदीखताचे वेळी होम लोन द्वारे व रोख अथवा चेकद्वारे द्यावेत. ते आम्हाला कबुल व मान्य. |
| १०,६५,०००=०० | एकूण रक्कम रु. दहा लाख पासष्ठ हजार मात्र. |

येणे प्रमाणे भरण्याचा तपशिल आम्हाला कबूल, भरण्याची तक्रार राहीली नाही.

सदर मिळकतीचे बांधकाम पुर्ण झालेनंतर तुम्ही तुमचे खर्चाने खरेदीखत करून घ्यावे व ते आम्ही तुमचे लाभात करून देऊ. सदर मिळकतीचा कब्जा आम्ही तुम्हास खरेदीखताचे वेळी देऊ.

तसेच वरील मिळकतीचा आम्ही या अगोदर कोणास सौदापावती, गहाण, तारण, बक्षीस वगैरे करून दिलेले नाही व यापुढेही कोणाशी करारमदार करणार नाही अगर कुठेही गहाण, खरेदी, बक्षीस वगैरे देणार नाहीत. सदर मिळकतीमध्ये विज मीटर व नळ कनेक्शन तुम्ही तुमच्या खर्चाने घ्यावयाचे आहे.

सदरचे सौदापावती ही आमचेवर व आमचे वालीवारसांवर बंधनकारक आहे व राहील.

येणेप्रमाणे सौदापावती आम्ही तुम्हास आज रोजी राजी खुशीने वाचून घेऊन, समजुन घेऊन, कोणाचेही दबावाला अगर आमिषाला बळी न पडता लिहुन दिले असे. सही तारीख मजकुर मु. अमळनेर. ता.- १०/११/२०२१

लिहुन देणार सही -

१) -------------------

२) -------------------

लिहुन घेणार सही -

१) -------------------

२) -------------------

साक्षिदारांच्या सह्या -

१. ------------------------ २. --------------------------------